घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरुस्ती
सुधाकर कॉम्प्लेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०


# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर


प्रीतिसंगम आता आहे डिजिटल!
प्रीतिसंगम आता गुगलवर उपलब्ध!
'प्रीतिसंगम वर्तमानपत्र' शोधा | www.pritisangam.com
दैनंदिन अपडेट्स, बातम्या, विश्लेषण आणि बरेच काही, कधीही, कुठेही पहा! आत्ताच भेट द्या!
गुगलवर 'प्रीतिसंगम' शोधा आणि बातम्यांचा आनंद घ्या!
• ई-पेपर प्रवेश • थेट अपडेट्स • २४x७ कव्हरेज • प्रादेशिक आणि जागतिक बातम्या
www.pritisangam.com

वर्ष ३० वे | अंक १७८ | पाने ४ | किंमत २ रूपये | गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# पुणे विभागातून कौस्तुभ गावडे आणि हर्षदा जाधव विजयी

## विधानपरिषदेच्या निवडणूकीत मविआला ३ तर महायुतीला २ जागा

**पुणे/प्रतिनिधी:-**

विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात कौस्तुभ गावडे यांनी अखेर १८ वर्षांच्या खंडानंतर पुन्हा भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकविण्यात यश मिळविले. गावडे यांनी शिंदेसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सापन यांचा तब्बल ६ हजार ७७० मतांनी पराभव केला. एकूण वैध मतांमधून २५ हजार ७५६ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. त्यात गावडे यांना निर्धारित मते न मिळाल्याने २७ बाद फेऱ्यांनतर २३ हजार १७७ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी सानप यांना १६ हजार ३४७ मते मिळाली. या मतदारसंघातून आजवर निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये गावडे सर्वात तरुण उमेदवार ठरले आहेत. विद्यमान आमदार काँग्रेसचे जयंत आसगावकर चौथ्या क्रमांकावर फेकले गेले.

दरम्यान अटी तटीच्या या निवडणूकीत महाविकास आघाडीने तीन जागा जिंकल्या तर महायुतीला दोन जागा मिळाल्या.

पुणे शिक्षक मतदारसंघात एकूण ८५.८७ टक्के मतदान झाले होते, ज्यामध्ये ६१ हजार ९४० मतदारांपैकी ५३ हजार १८५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतमोजणीच्या अंतिम आकडेवारीनुसार, कौस्तुभ गावडे यांनी तब्बल २३ हजार ११७ मते मिळवून पहिला क्रमांक पटकावत विजय मिळवला.



दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले शिवसेना (शिंदे गट) पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन नवनाथ सानप यांनी १६ हजार ३४७ मते मिळवली. गावडे आणि सानप यांच्यामध्ये ६ हजार ७७० मतांचा

पान २ वर

### सर्वांसोबत खांद्याला खांदा लावून काम करू:कौस्तुभ गावडे

सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा आपला प्रयत्न असेल. महायुती म्हणून एकत्रित काम केले असून, यापुढेही सर्वांसोबत खांद्याला खांदा लावून काम करू, अशी भूमिका त्यांनी मांडली. निवडणुकीदरम्यान माझ्या वयावरून मुद्दे उपस्थित करण्यात आले, तरी मी कोणावरही टीका केली नाही, असे गावडे यांनी सांगितले. टीकाकारांना प्रत्युत्तर देण्यासाठी शब्दांपेक्षा आपल्या कामावर भर देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### उमेदवारांना मिळालेली अंतिम मते

*कौस्तुभ मुरलीधर गावडे (भाजप) : २३,११७ (विजयी)
*सचिन नवनाथ सानप (अपक्ष/शिवसेना पुरस्कृत): १६,३४७
*दत्तात्रय अच्युतराव सावंत (रासप) : १२,६८७
*जयंत दिनकर आसगावकर (काँग्रेस) : ८,९६५



## हर्षदा जाधव देशमुख यांच्या विजयाने साताऱ्यात राष्ट्रवादीचा गुलाल

**सातारा/प्रतिनिधी:-**

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार हर्षदा जाधव देशमुख यांनी विजय मिळवत भाजपला धक्का दिल्यानंतर साताऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि पेढेवाटप करत कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद साजरा केला. घोषणांनी परिसर दणाणून सोडत कार्यकर्त्यांनी या विजयाचा उत्साह व्यक्त केला.

संपूर्ण पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची मतमोजणी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी आठ वाजता सुरू झाली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या हर्षदा जाधव देशमुख यांनी १ लाख ११ हजार ७१७ मते मिळवत विजय संपादन केला. भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांना १ लाख २ हजार ७९७ मते मिळाली. त्यामुळे हर्षदा जाधव देशमुख यांनी ८ हजार ९२० मतांच्या फरकाने बाजी मारली.

निकाल स्पष्ट होताच साताऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाक्यांची आतषबाजी केली, गुलाल उधळला आणि एकमेकांना पेढे भरवून विजयाच्या शुभेच्छा दिल्या. पक्षाच्या विजयाच्या घोषणा देत कार्यकर्त्यांनी परिसरात उत्सवी वातावरण निर्माण केले.

या विजयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला असून, आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवरही या निकालाला महत्त्व प्राप्त झाले आहे. भाजपच्या उमेदवारावर मात करत हर्षदा जाधव देशमुख यांनी मिळवलेल्या यशाचा आनंद साताऱ्यातील राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे साजरा केला

# कराडमध्ये पाणीपुरवठ्याला कात्री

## नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव; टंचाईच्या पार्श्वभूमीवर पालिकेचे नवे वेळापत्रक, चार टँकर मागविणार

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरातील पाणीटंचाईची संभाव्य तीव्रता लक्षात घेऊन कराड नगरपालिकेने पाणीपुरवठ्याचे नियोजन बदलण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबरदरम्यान दिवसातून एकदाच एक तास पाणीपुरवठा केला जाणार आहे. ५ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत दिवसातून दोन वेळा पाणी दिले जाणार असून, १२ नोव्हेंबरपासून पुन्हा दिवसातून एकदाच एक तास पाणीपुरवठा केला जाणार आहे. पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांना प्रथम नोटीस आणि त्यानंतर एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

करड शहराची लोकसंख्या सुमारे एक लाख १५ हजार असून, शहराला दररोज दोन कोटी १६ लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो.



सध्याची पाणीटंचाई लक्षात घेऊन शासनाने पाणीपुरवठ्यात दहा टक्के कपात करण्याचे निर्देश नगरपालिकांना दिले आहेत. त्यानुसार शहरातील पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. कराड नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारे दिवसातून एक वेळ केवळ एक तास पाणीपुरवठा करण्याची वेळ आली असल्याचे यादव यांनी सांगितले.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाकडून पर्यायी व्यवस्थाही उभारण्यात येत आहे. भविष्यात पाण्याची मागणी वाढल्यास नागरिकांना दिलासा देण्यासाठी चार नवीन पाण्याचे टँकर मागविण्यात येणार आहेत. तसेच पाणी जपून वापरण्याचे आवाहन करतानाच, पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, शहरातील काही भागांत पाण्याची चव आणि रंग बदलल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पाण्याची गुणवत्ता चांगली राखण्यासाठी

पान ३ वर

| अं.नं. | पाण्याचे टाकीचे नांव | सध्याचा दररोज होणारा पाणी पुरवठा वेळ | बद्दल करणेत आलेल्या पाणी पुरवठ्याची वेळ |
|---|---|---|---|
| १ | MBR पाण्याची टाकी | सकाळी व संध्या ५.०० ते ७.०० | संध्याकाळी ८.०० ६.०० ते |
| २ | पेठ रविवार पाण्याची टाकी- | सकाळी व संध्या ७.३० ते ८.४५ | सकाळी ७.३० ते ८.४५ |
| ३ | मार्केट यार्ड पाण्याची टाकी | सकाळी व संध्या ६.०० ते ७.३० | सकाळी ६.०० ते ७.३० |
| ४ | सूर्यवंशी मळा कडील बाजू झोन | सकाळी व संध्या ६.०० ते ७.०० | संध्याकाळी ६.३० ते ७.३० |
| ५ | मुजावर कॉलनी कडील बाजू झोन | सकाळी व संध्या ७.०० ते ८.०० | संध्याकाळी ७.३० ते ८.३० |
| ६ | टाऊन हॉल पाण्याची टाकी- | सकाळी व संध्या ६.३० ते ७.३० | संध्याकाळी ६.३० ते ७.३० |
| ७ | गजानन हौसिंग सोसायटी- | सकाळी ६.३० ते ७.३० | सकाळी ६.३० ते ७.३० |
| ८ | रुक्मिणी नगर पाण्याची टाकी- | सकाळी व संध्या ६.३० ते ७.३० | सकाळी ६.३० ते ७.३० |
| ९ | जुना सोमवार पाण्याची टाकी- | सकाळी व संध्या ६.०० ते ७.०० | सकाळी ६.०० ते ७.०० |
| १० | नवीन सोमवार पाण्याची टाकी | सकाळी व संध्या ६.०० ते ७.०० | सकाळी ६.०० ते ७.०० |

## खंडणी, जबरी चोरी प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

खंडणी, जबरी चोरीसह नुकसान केल्याप्रकरणी एका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २६ रोजी सकाळी सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास राहुल गोरखनाथ सोनवणे रा. मल्हार पेठ, सातारा यांच्या घरात येऊन त्यांच्याकडे एक लाख रुपयांची मागणी करत दहा हजार रुपये खंडणीची मागणी करून सोनवणे यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून त्यांच्या कारचे दगड मारुन नुकसान केल्याप्रकरणी योगराज अरुण त्रिंबके रा. मल्हारपेठ, सातारा यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे करीत आहेत.

# गुजरातचे दोघे आमचा सह्याद्री पोखरणार का?

**पुणे/प्रतिनिधी:-**

वाढत्या लोकसंख्येला, उद्योग धंद्यांना वीज लागेल हे मान्य आहे. पण ही गरज भागवण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या वीज प्रकल्पांसाठी जंगलतोड इतका एकच पर्याय आहे का असा सवाल राज ठाकरे यांनी सरकारला विचारला.

कर्जत येथील डोंगरात प्रस्तावित असलेल्या जलविद्युत प्रकल्पाच्या पंपिंग स्टेशनसाठी सुरू असलेल्या वृक्षतोडीविरोधात मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज कर्जत येथे वादळी सभा घेतली. यावेळी राज्यात सध्या येत असलेले सर्व प्रकल्प हे मुंबई गुजरातला जोडण्याचा डाव पूर्णत्वास नेण्यासाठीच्या दीर्घकालीन योजनेचा भाग असल्याचा सनसनाटी आरोप केला. तसेच वाढत्या लोकसंख्येला, उद्योग धंद्यांना वीज लागेल हे मान्य आहे. पण ही गरज भागवण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या वीज प्रकल्पांसाठी जंगलतोड इतका एकच पर्याय आहे का असा सवाल राज ठाकरे यांनी सरकारला विचारला.



# सहकार क्षेत्राच्या दृष्टीने जिल्हा बँकेची निवडणूक महत्वाची:ना.गोरे

**कराड/प्रतिनिधी:-**

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजप-महायुतीच्या सर्व अधिकृत उमेदवारांच्या विजयासाठी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने, समन्वयाने व नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन केले. प्रचाराच्या नियोजनात संघटनात्मक समन्वय राखून प्रत्येकाने सक्रिय सहभाग घ्यावा आणि सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.सहकार क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने या निवडणुकीला महत्त्व असून, महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचाराला गती देण्यासाठी सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन यावेळी ना.जयकुमार गोरे यानी केले.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणूक २०२६-२०३१ च्या पार्श्वभूमीवर भाजप-महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आज कराड येथे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा प्रचार मेळावा आयोजित करण्यात आला.

या प्रचार मेळाव्याला राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले महाराज, सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई आणि मंत्री मकरंद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



या प्रचार मेळाव्याला माजी मंत्री रामराजे नाईक-निंबाळकर, आमदार धैर्यशील कदम, माजी आमदार आनंदराव नाना पाटील, उदयसिंह पाटील, चंद्रकांत जाधव, याज्ञसेन पाटणकर, ऋतुजा राजेश पाटील, बाळासाहेब सोळस्कर, जयवंतराव शेलार, अर्जुन तात्या काळे, योगेश फडतरे यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख नेते उपस्थित होते. तसेच कराड व पाटण तालुक्यांतील विविध विकास सेवा सोसायट्यांचे अध्यक्ष, संचालक व सदस्य, महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

### दुबार..

मतदारयादी झळके
दिसे माझेनाव दुबार
कौतुकवाटे बापाला
नाव काढतोयं प्वार
मतदारयादी चांगली
माना तिचेचं आभार
तपासून पहावे नीट
नाव असणारं तिबार
मतदाना मी जाताचं
निराशा पदरात फार
माझ्याआधीच दुसरा
मतदान करुन पसार
दहा बाय दहा खोली
भरतोय गच्च दरबार
पन्नास जण राहतात
याच पत्त्या वरी भार
फेमसकेलायं ड्रेस
धन्यवाद देई साभार
अनेक आधार कार्डा
इथे मिळाला आधार
पण्जोबा कसेजीवंत
जन्म घेतात वारंवार
मतदानार्थ पृथ्वीवर
खास घेतात अवतार
मतदार यादीचा हवा
सातत्याने जिर्णोद्धार
मदतीसएसआयआर
जागरुक हवे मतदार

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# कोयना धरण शंभूराजेंच्या मालकीचे नाही

## राजू शेट्टींचा घणाघात ;कृष्णा-कोयना संगमाची पाहणी, पाणी न सोडल्यास जनतेला घेऊन धरणावर धडकणार

**कराड/प्रतिनिधी:-**

कोयना धरणासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी, घरदारांचा त्याग केला असताना त्यांनाच आज पाण्यापासून वंचित ठेवले जात आहे. धरणातील पाणी सोडण्याचा निर्णय पालकमंत्र्यांच्या मर्जीवर अवलंबून राहू शकत नाही. सरकारने तातडीने पाणी सोडले नाही, तर जनतेला सोबत घेऊन कोयना धरणावर धडक देत पाणी सोडू, असा आक्रमक इशारा शेतकरी नेते व माजी खासदार राजू शेट्टी यांनी बुधवारी दिला.

कराड येथील कृष्णा-कोयना संगम परिसरातील कोरड्या नदीपात्रांची पाहणी केल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. कोयना धरण यंदा शंभर टक्के भरले असतानाही नदीपात्रातील पाण्याचा विसर्ग थांबविण्यात आल्याने सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांत पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. धरणातील पाण्याचा विसर्ग थांबविण्याच्या निर्णयावरून त्यांनी साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई



यांच्यावर निशाणा साधला. 'कोयना धरण हे सातारा जिल्ह्याचे किंवा शंभूराज देसाई यांची खासगी मालमत्ता नाही. धरणासाठी त्याग केलेल्या जनतेला पाणी मिळालेच पाहिजे,' अशी भूमिका त्यांनी मांडली.

शेट्टी म्हणाले, कोयना धरण १०० टक्के भरल्याने यापूर्वी दररोज सुमारे १००० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू होता. या पाण्यामुळे वीजनिर्मितीबरोबरच कृष्णा आणि कोयना नदीकाठच्या भागांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होत होते. मात्र, विसर्ग थांबविण्यात आल्याने दोन्ही नद्यांची पात्रे कोरडी पडली आहेत. कराडसारख्या महत्त्वाच्या संगमस्थळीही पाण्याअभावी गंभीर स्थिती निर्माण झाली आहे.

या प्रश्नाकडे आपण यापूर्वीच सरकारचे लक्ष वेधले होते, असे सांगून शेट्टी म्हणाले, १८ ऑगस्ट रोजी कोल्हापूर विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन नदीपात्रांतील पाण्याची स्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. पाण्याचा विसर्ग वाढविण्याची मागणीही केली होती. त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांनी पाणी सोडण्याचे आदेश देण्याचे आश्वासन दिले; मात्र अद्याप प्रत्यक्षात पाणी सोडण्यात आले नसल्याचे त्यांनी सांगितले.

सांगलीसारख्या मोठ्या शहराला पिण्याचे पाणी मिळणेही कठीण होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. गुरुवारी दुपारपर्यंत सांगलीकरांना पिण्यासाठी पाण्याचा एकही थेंब उपलब्ध होणार नाही, अशी भीषण स्थिती असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. सरकारमधील अंतर्गत सत्तासंघर्षामुळे तीन जिल्ह्यांतील नागरिक आणि शेतकऱ्यांना वेठीस धरले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाणी सोडू नये, असे सांगितल्याची माहिती ऐकिवात असल्याचे नमूद करत त्यांनी या प्रकरणात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी राजकारण बाजूला ठेवून निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.

सरकारला अंतिम इशारा देताना शेट्टी म्हणाले, पाणी सोडण्याचा निर्णय तातडीने न झाल्यास गुरुवारी सांगलीतील स्टेशन चौकात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे पुतळे जाळण्यात येतील. त्यानंतर जनतेला सोबत घेऊन कोयना धरणावर जाऊन पाणी सोडण्याची भूमिका घेतली जाईल. धरणासाठी आमच्या पूर्वजांनी जमिनी दिल्या, घरेदारे गमावली. त्यामुळे पाणी हे आमच्या हक्काचे आहे. जनतेच्या पाण्यावर राजकारण केले जात असेल, तर ते सहन केले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# पाण्याच्या काटेकोर नियोजनाचा मंत्रिमंडळाचा निर्णय

## शंभूराज देसाईंचा राजू शेट्टींना टोला; कायदा हातात घेतल्यास कारवाई

**कराड/प्रतिनिधी:-**

कोयना धरणातील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत १६ टीएमसीने कमी असून, ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता राखण्याचे मोठे आव्हान आहे. त्यामुळे पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या वस्तुस्थितीची माहिती न घेता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू



शेट्टी यांच्याकडून भूमिका मांडली जात असल्याचा

पान ३ वर

### पराभवाचे विश्लेषण करणार

पुणे शिक्षक मतदारसंघातील शिवसेनेच्या उमेदवाराला अपेक्षेपेक्षा कमी मते मिळाल्याबाबत देसाई म्हणाले, या निकालाचे सविस्तर विश्लेषण करणे आवश्यक आहे. सध्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत व्यस्त असल्याने त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. जिल्हा बँकेची निवडणूक झाल्यानंतर या निकालाचा आढावा घेऊन त्यावर विचार केला जाईल.

### पूर्णेकर हत्याप्रकरणी चौकशीनंतर पुढील कारवाई

आदित्य ठाकरे यांच्या आंदोलनाबाबत बोलताना देसाई म्हणाले, पूर्णेकर हत्याप्रकरणी शिवसेनेने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्याही दोषीला पाठिशी घातले जाणार नसल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले आहे. संशयितांना चौकशीसाठी पोलिसांनी बोलावले असून, चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.

# संपादकीय

## महागाई आणि दुष्काळ

महागाई हा केवळ अर्थव्यवस्थेतील आकडेवारीचा विषय नाही, तर सामान्य माणसाच्या रोजच्या जगण्याशी जोडलेला गंभीर प्रश्न आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत प्रत्येकाच्या आयुष्यात अन्न, इंधन, शिक्षण, आरोग्य आणि निवारा या मूलभूत गरजांना अनन्यसाधारण महत्त्व असते. मात्र, याच गरजांची पूर्तता करताना सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक ओढाताण होत असेल, तर विकासाच्या दाव्यांचे मूल्यमापन करणे अपरिहार्य ठरते. देशात जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असताना आणि ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे दुष्काळाच्या झळा सोसत असताना, सामान्य माणसाने जगायचे कसे, हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येत आहे.

कांदा, डाळी, खाद्यतेल, साखर, तांदूळ आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्याने घरखर्चाचे गणित बिघडले आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, सरकारच्या किंमत-देखरेखीखाली असलेल्या ४२ जीवनावश्यक वस्तूंपैकी ४१ वस्तूंच्या किमतीत वर्षभरात वाढ झाली असून, कांद्याच्या दरातील वाढ विशेष चिंताजनक आहे. साखर आणि सूर्यफूल तेलाच्या किमतींतही लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. तूरडाळ, हरभरा डाळ आणि अन्य खाद्यपदार्थ महागल्याने सामान्य कुटुंबांच्या स्वयंपाकघरातील खर्च वाढला आहे. या दरवाढीचा सर्वाधिक फटका निश्चित उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना बसतो. महागाईची झळ सर्वांनाच बसते; मात्र तिचे परिणाम सर्वांसाठी समान नसतात. भरघोस उत्पन्न असलेल्या व्यक्तीला एखाद्या वस्तूची किंमत वाढल्यास आपल्या खर्चात थोडी कपात करणे शक्य असते. परंतु रोजंदारीवर काम करणारा मजूर, अल्पभूधारक शेतकरी, हातावर पोट असलेले कामगार, निवृत्तिवेतनधारक आणि कमी वेतनात संसार चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांसमोर पर्यायच उरत नाही. घरभाडे, वीजबिल, प्रवासखर्च, मुलांचे शिक्षण आणि औषधोपचार यांसाठी पैसे बाजूला काढल्यानंतर अन्नधान्यासाठी किती रक्कम उरते, हा त्यांच्या जगण्याचा रोजचा हिशेब बनला आहे. त्यामुळे महागाईचा प्रश्न केवळ बाजारभावापुरता मर्यादित न राहता सामाजिक न्यायाचा प्रश्न ठरतो.

सप्टेंबर २०२६ मध्ये किरकोळ महागाईचा दर ५.५४ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे उपलब्ध आकडेवारीत नमूद आहे. अन्नधान्याच्या महागाईचा दर ७.७४ टक्क्यांपर्यंत वाढल्याने कुटुंबांच्या खर्चावरील दबाव स्पष्ट होतो. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईतही वाढ नोंदवली गेली आहे. इंधन, ऊर्जा, कच्चे पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, धातू आणि उत्पादित वस्तूंच्या किमती वाढल्याचा परिणाम उत्पादन आणि वाहतूक खर्चावर होऊ शकतो. महागाईचे हे आकडे केवळ सरकारी अहवालात नोंदवले जात नाहीत; त्यांचे प्रतिबिंब प्रत्यक्ष जीवनात उमटते. किरकोळ महागाईमुळे मुलांच्या गरजा पुढे ढकलणे आणि आरोग्यावरील खर्चात कपात करणे, अशा तडजोडी अनेक कुटुंबांना कराव्या लागतात. पोषणमूल्य आहार परवडेनासा झाला, तर त्याचे परिणाम बालकांच्या आरोग्यावर आणि कुटुंबातील ज्येष्ठांच्या प्रकृतीवरही होऊ शकतात. म्हणूनच महागाईचा विचार करताना केवळ ग्राहक किंमत निर्देशांक न पाहता लोकांच्या क्रयशक्तीचा आणि जीवनमानाचा विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांसमोरील संकट अधिक गंभीर बनते. पावसाचे अनिश्चित आगमन, पिकांचे नुकसान, पाण्याची कमतरता आणि शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. दुसरीकडे, बाजारात अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असल्यास त्याच शेतकऱ्याला ग्राहक म्हणून अधिक पैसे मोजावे लागतात. उत्पादनातून मिळणारे उत्पन्न कमी आणि उपभोगासाठी करावा लागणारा खर्च जास्त, अशा दुहेरी कात्रीत ग्रामीण अर्थव्यवस्था सापडते.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतातील पिकांपुरता मर्यादित राहत नाही. ग्रामीण भागातील शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, मजुरी आणि स्थानिक बाजारपेठ यांनाही त्याची झळ बसते. रोजगाराच्या संधी कमी झाल्यास कुटुंबांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. पिण्याचे पाणी, चारा, रोजगार आणि अन्नसुरक्षा या मूलभूत गरजांची चिंता एकाच वेळी सतावू लागते. अशा परिस्थितीत महागाईचा भार सहन करणे अधिक कठीण बनते. कांदा आणि अन्य भाजीपाल्याच्या किमती वाढल्याने ग्राहक त्रस्त होतात; परंतु दरवाढीचा संपूर्ण फायदा शेतकऱ्यांनाच मिळतो असेही नाही. उत्पादन घटणे, साठवणुकीतील अडचणी, वाहतूक खर्च, बाजारातील मध्यस्थांची भूमिका आणि बाजारभावातील चढ-उतार यांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चितता कायम राहते. त्यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यात संघर्ष निर्माण करण्याऐवजी उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.

महागाई, परवडणाऱ्या घरांचा अभाव, निवृत्तिवेतन, शिक्षणाचा घसरता दर्जा, भ्रष्टाचार आणि युद्धविरोधी भूमिका या मुद्द्यांवर युरोपातील फ्रान्स, अल्बानिया, इटली, स्पेन आणि पोर्तुगालमध्ये नागरिकांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केल्याचे वृत्त आहे. या आंदोलनांमधून एक महत्त्वाचा संदेश पुढे येतो, आर्थिक विकासाचे दावे तेव्हाच लोकांना स्वीकारार्ह वाटतात, जेव्हा त्याचा लाभ त्यांच्या दैनंदिन जीवनात जाणवतो. नागरिकांच्या मूलभूत गरजा भागत नसतील, तर सामाजिक असंतोष वाढणे स्वाभाविक आहे. भारताची अर्थव्यवस्था, सामाजिक रचना आणि आर्थिक परिस्थिती युरोपातील देशांपेक्षा वेगळी असली, तरी महागाईचा सामान्य नागरिकांच्या जीवनावर होणारा परिणाम हा समान चिंतेचा विषय आहे. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का, लोकांच्या उत्पन्नाच्या तुलनेत खर्च किती वाढतो आणि त्यांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक सुविधा मिळतात का, या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत. खासगीकरणाच्या प्रक्रियेत सार्वजनिक सेवांचा खर्च सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर जाणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारने सर्वप्रथम जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठा साखळीवर प्रभावी लक्ष ठेवणे आवश्यक आहे. साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर नियमांनुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. राखीव साठ्यातील धान्य व कडधान्य बाजारात उपलब्ध करून देण्यासारखे उपाय करावेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून गरजू कुटुंबांना परवडणाऱ्या दरात धान्य मिळण्याची खात्री केली पाहिजे. याचबरोबर रोजगारनिर्मिती, वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या धोरणांवर भर द्यावा लागेल. आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधनाचे दर, हवामानातील बदल, उत्पादनातील चढ-उतार आणि जागतिक संघर्ष यांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. मात्र, या आव्हानांचा आधार घेऊन सरकार आपली जबाबदारी टाळू शकत नाही. एका बाजूला दुष्काळाचे चटके आणि दुसऱ्या बाजूला महागाईचा भडका, अशा परिस्थितीत सामान्य माणसाचे जगणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. आज प्रत्येक सामान्य भारतीयाच्या मनात, महागाई वाढतेय, उत्पन्न पुरत नाही, दुष्काळाने जगणे कठीण झाले आहे; मग सामान्य माणसाने जगायचे कसे ? या प्रश्नाचे उत्तर घोषणांतून नव्हे, तर सर्वसामान्यांच्या जीवनात प्रत्यक्ष दिलासा देणाऱ्या कृतीतून केंद्र सरकारने द्यायला हवे.

# हिंसक आंदोलनामुळे फ्रान्ससह युरोप अस्थिर !

**जगातील प्रगत आणि विकसित देशांमध्ये गणल्या जाणाऱ्या युरोपातील अनेक राष्ट्रांना सध्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अस्थिरतेचा सामना करावा लागत आहे. फ्रान्ससारख्या देशातही वाढती महागाई, बेरोजगारी, सरकारी धोरणांविरोधातील नाराजी आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या असंतोषाचे रूपांतर अनेक ठिकाणी हिंसक आंदोलनांमध्ये होत असल्याने परिस्थिती चिंताजनक बनली आहे. लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना आंदोलन करण्याचा अधिकार असला, तरी आंदोलनाला हिंसक वळण लागणे हे कोणत्याही देशाच्या हिताचे नाही.**






**श्याम ठाणेदार**
**पुणे**

फ्रान्समध्ये सरकारच्या आर्थिक धोरणांविरोधात नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. वाढत्या महागाईमुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. घरभाडे, अन्नधान्य, इंधन आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढत असताना उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसल्याने सर्वसामान्य जनतेची आर्थिक ओढाताण होत आहे. दुसरीकडे, सरकारच्या निर्णयांमुळे आपल्या जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होत असल्याची भावना नागरिकांमध्ये बळावत आहे. परिणामी, सरकारविरोधातील जनक्षोभ वाढत असून त्याचे पडसाद रस्त्यांवरील आंदोलनांत उमटत आहेत.

युरोपातील अस्थिरतेमागे केवळ महागाई हेच एक कारण नाही. बेरोजगारी, आर्थिक विषमता, स्थलांतराचे प्रश्न, सामाजिक असुरक्षितता आणि सरकारवरील कमी होत चाललेला विश्वास, अशा अनेक घटकांचा त्यामागे प्रभाव आहे. विशेषतः तरुणांमध्ये भविष्याविषयी अनिश्चितता वाढत असल्याने त्यांच्या मनातील असंतोष अधिक तीव्र होत आहे. रोजगाराच्या संधी, परवडणारे शिक्षण, निवासाची सुविधा आणि सुरक्षित भविष्य या अपेक्षा पूर्ण होत नसतील, तर समाजात नाराजी निर्माण होणे स्वाभाविक आहे.

मात्र, आंदोलनाच्या नावाखाली सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणे, दुकाने लुटणे, वाहनांची जाळपोळ करणे आणि पोलिसांवर हल्ले करणे याचे समर्थन करता येणार नाही. अशा हिंसाचारामुळे सर्वाधिक नुकसान सामान्य नागरिकांचे आणि छोट्या व्यावसायिकांचे होते. लोकशाहीमध्ये सरकारला जाब विचारण्याचा अधिकार आहे; परंतु त्या अधिकाराचा वापर जबाबदारीने झाला पाहिजे. त्याचबरोबर आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून केवळ बळाचा वापर केल्यास परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता असते.

सरकारने जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे आणि आंदोलनकर्त्यांनीही संयम राखणे, या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत. जनतेच्या असंतोषामागील वास्तविक कारणे समजून घेऊन त्यावर ठोस उपाययोजना करणे ही सरकारची जबाबदारी आहे. महागाईवर नियंत्रण, रोजगारनिर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे आणि सामान्य नागरिकांना दिलासा देणारी धोरणे राबविणे याला प्राधान्य दिले पाहिजे. केवळ आश्वासने देऊन किंवा कठोर कारवाई करून जनतेचा विश्वास संपादन करता येणार नाही.

फ्रान्ससह युरोपातील अस्थिरतेची ही परिस्थिती जगातील इतर देशांसाठीही एक महत्त्वाचा धडा आहे. आर्थिक विकासाचे आकडे वाढत असले, तरी त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचला नाही, तर विकासाला अर्थ उरत नाही. जनतेच्या मूलभूत गरजा, अपेक्षा आणि भावनांकडे दुर्लक्ष केल्यास असंतोषाचा उद्रेक होऊ शकतो. त्यामुळे विकासाबरोबर सामाजिक न्याय, आर्थिक समानता आणि जनतेचा विश्वास टिकवणे आवश्यक आहे. सरकार आणि जनता यांच्यातील संवाद कायम राहिला, तरच अस्थिरतेचे संकट दूर होऊन शांतता, स्थैर्य आणि लोकशाही अधिक मजबूत होऊ शकते.

## मालखेडमध्ये वृक्षारोपणासह संवर्धनाचाही संकल्प

**कराड/प्रतिनिधी : –**

सध्याच्या काळात पर्यावरणाचा ढासळणारा समतोल आणि वाढते प्रदूषण ही एक गंभीर समस्या बनली आहे. यावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करण्याची गरज ओळखून मालखेड (ता. कराड) येथील सामाजिक कार्यकर्ते अमर पवार यांच्या वतीने परिसरात सावली देणारी आणि पर्यावरणाला पूरक असणारी झाडे लावण्यात आली.

वृक्षारोपणप्रसंगी सरपंच इंद्रजीत ठोंबरे, माजी सरपंच श्रीकांत चरणकर, अक्षय पाटील, संदीप चरणकर, करुणा कोळी, शिवराज बुरुंगे, चंद्रकांत कोळी आणि विश्वनाथ गुरव आदी उपस्थित होते.

केवळ झाडे लावून न थांबता त्यांचे नियमित संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्पही त्यांनी यावेळी केला. यावेळी अमर पवार म्हणाले, प्रत्येकाने आपल्या आनंदाच्या प्रसंगी एक रोपटे लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केल्यास पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला निश्चितच हातभार लागू शकतो.

# हैद्रा दर्ग्यात नैवेद्यासाठी दोन हजारांची मागणी

## भाविकांचा आरोप ;दमदाटी,शिवीगाळ व मनमानी वसुलीच्या तक्रारी, कारवाईची मागणी

**अक्कलकोट/महेश गायकवाड:–**

अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथील हिंदू-मुस्लिम भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या ख्वाजा पीर सैय्यदल मुलाणी दर्ग्यात नैवेद्य व पूजाविधीच्या नावाखाली भाविकांकडून मनमानी पद्धतीने पैसे वसूल केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नैवेद्य स्वीकारण्यासाठी दोन हजार रुपयांची मागणी, पैसे देण्यास नकार दिल्यास दमदाटी व शिवीगाळ, तसेच देणग्यांच्या हिशोबाबाबत अनियमितता असल्याच्या तक्रारी भाविकांनी केल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> पूजेसाठी दोन हजार रुपये घेतले. नैवेद्य स्वीकारण्याबाबत विनंती करूनही दखल घेतली नाही. पावती मागितल्यावर शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. नारळ फोडणे, अंघोळ आणि नैवेद्यासाठीही पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी आहेत. प्रशासनाने चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी.
> – अंबादास राठोड
> भाविक, जेऊरवाडी

> पुजाऱ्यांकडून मनमानी पद्धतीने रक्कम वसूल करणे आम्हाला मान्य नाही. तीन तारखेच्या बैठकीत ५०० रुपये शुल्क निश्चित करण्याबाबत निर्णय घेतला जाईल. त्यानंतरही कोणी मनमानी वसुली केल्यास संबंधितांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.
> –एम.डी.रफीक शिराजोद्दीन मुजावर
> (अध्यक्ष, हैद्रा ट्रस्ट)



हैद्रा येथील दर्ग्यात हिंदू-मुस्लिम समाजातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. मात्र, अलीकडेच नैवेद्य स्वीकारण्यासाठी दोन हजार रुपये मागितल्याचा प्रकार घडल्याचे एका भाविकाने सांगितले. रक्कम देण्याबाबत विचारणा केली असता दमदाटी व शिवीगाळ करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. नारळ फोडणे, अंघोळ करणे आणि नैवेद्य दाखवणे अशा विविध विधींसाठीही पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

दर्ग्यातील दर्शन व पूजाविधींसाठी काही भाविकांकडून ५०० ते ५,००० रुपयांपर्यंत रक्कम मागितली जात असल्याचा आरोप सोलापूर येथील भाविक राजाराम वाघमारे यांनी केला. दर्ग्याला भाविकांकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळत असताना त्यांचा हिशोब पारदर्शक असावा, अशी मागणीही त्यांनी केली. दर्गा परिसरातील बांधकामासाठी शासनाचा निधी, वर्गणी व देणग्या उपलब्ध असल्याचे सांगितले जात असताना भाविकांकडून स्वतंत्रपणे पैसे का मागितले जात आहेत, असा सवालही उपस्थित करण्यात येत आहे.

या प्रकाराबाबत ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप भाविकांनी केला आहे. स्थानिक पातळीवर तक्रार करण्याचा प्रयत्न केल्यास विरोध आणि त्रास सहन करावा लागत असल्याचेही काही भाविकांचे म्हणणे आहे. त्यामुळे दर्ग्यातील आर्थिक व्यवहार, देणग्यांचा हिशोब आणि पूजाविधींसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्काची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, ट्रस्टचे अध्यक्ष एम. डी. रफीक शिराजोद्दीन मुजावर यांनी मनमानी वसुली मान्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. तीन तारखेच्या बैठकीत व्यवस्थापनाकडून स्वीकारण्यात येणारे शुल्क केवळ ५०० रुपये निश्चित करण्याचा निर्णय घेतला जाईल. त्यानंतरही कोणी मनमानी वसुली केल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असे त्यांनी सांगितले.

### दर्गा वक्फ बोर्डाच्या ताब्यात देण्याची मागणी

हैद्रा येथील दर्ग्याच्या व्यवस्थापनाबाबत आणि भाविकांकडून कथितपणे होत असलेल्या आर्थिक वसुलीबाबत चौकशी करण्याची मागणी पुढे आली आहे. दर्ग्याला मोठ्या संख्येने हिंदू भाविक भेट देत असल्याने तेथील व्यवहार पारदर्शक असावेत, अशी भूमिका काही मुस्लिम नागरिकांनी मांडली आहे. दर्ग्याचे व्यवस्थापन वक्फ बोर्डाच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्याची माहिती आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**सोलापूर/प्रतिनिधी:–**

आपल्या मुलाविरुद्ध दाखल गुन्ह्यात तपासकामी मदत करतो असे सांगून १० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या वैराग पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार संदेष कृष्णदेव पवार (पो.ह.क्र. २१८०, नेम वैराग पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण) यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूरच्या पथकाने अटक केली आहे.



या प्रकरणी सोलापूर ग्रामीणमधील वैराग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२२/२०२६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रार अशी – ३९ वर्षीय शेतकरी असलेल्या तक्रारदाराने दि. २८/०९/२०२६ रोजी ला.प्र.वि. सोलापूर कार्यालयास संपर्क केला होता. तक्रारदाराच्या मुलाविरुद्ध दाखल गुन्ह्यामध्ये तपासकामी मदत करतो असे बोलून वैराग पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार संदेष पवार यांनी १,००,०००/- रु. ची मागणी केली. एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितल्यानंतर २०,०००/- रु. ची मागणी केली. परंतु तक्रारदाराने केलेल्या तडजोडीवरून शेवटी १०,०००/- रु. लाच मागणी केल्याची तक्रार प्राप्त झाली.

पडताळणी – पोलीस हवालदार संदेष पवार यांची दि. २८/०९/२०२६ रोजी वैराग पोलीस स्टेशन सोलापूर ग्रामीण येथे १३.४८ ते १५.३९ या कालावधीमध्ये पडताळणी करण्यात आली असून त्यावेळी त्यांनी तक्रारदाराच्या मुलाविरुद्ध दाखल गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी सुरुवातीस २०,०००/- रु. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/- रु. लाच मागणी केली आहे.

सापळा – आरोपीवर दि. २८/०९/२०२६ व दि. ०९/१०/२०२६ रोजी वैराग पोलीस स्टेशन येथे सापळा रचण्यात आला परंतु त्यांना तक्रारदार व पंचाबाबत संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम स्वीकारली नाही.त्यानंतर दि. २८/१०/२०२६ रोजी १४.०० वा. ताब्यात घेण्यात आलेले आहे.

ही कारवाई श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सापळा पथकात पोहेकॉ/५५१ सलीम मुल्ला, पोहेकॉ/३० संतोष नरोटे, पोहेकॉ/१६१६ स्वामीराव जाधव, पोकॉ/९६६ गजानन किणगी, पोकॉ/८६२ राजू पवार, चालक पोकॉ/२०२६ अक्षय श्रीराम यांचा समावेश होता. या कारवाईस शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र आणि अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र यांचे मार्गदर्शन लाभले.

# कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाचा क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पंचायत समिती अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने घेतल्या गेलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाच्या सिद्धाराम जमादार हा १०० व २०० मीटर धावण्यात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हासाठी निवड झाली आहे. १७ वर्षाखालील मुलांमध्ये ३००० मीटर धावण्यात संदीप चव्हाण हा तालुक्यात द्वितीय आला आहे.



१७ वयोगटात श्रद्धा शहापुरे ही गोळा फेक व भालाफेक या दोन्ही खेळात तालुक्यात प्रथम आली आहे, १९ वर्षाखालील मुलींमध्ये शगोपिया शेख ही लांब उडी व तिहेरी उडी मध्ये तालुक्यात प्रथम आली, अमन नदाफ हा २०० मीटर धावणे मध्ये प्रथम व १०० मीटर धावण्यामध्ये द्वितीय आला आहे.

सुमित खांडेकर हा ५८ किलो वजन गटात कुस्तीमध्ये तालुक्यात प्रथम आला आहे, तर गौरी झिंगाडे ही कराटे व तायक्कांदो खेळात तालुक्यात प्रथम आली आहे. प्रणाली पूलूर ही हातोडा फेक मध्ये द्वितीय, तर ४x१०० रिले व ४x४०० रिले मुलामध्ये तालुक्यात प्रथम.

तालुकास्तरीय सांघिक हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील मुलीमध्ये तालुक्यात प्रथम, तर १९ वर्षे मुलीच्या क्रिकेट स्पर्धेत तालुक्यात प्रथम. १९ वर्षे खालील मुलांमध्ये कबड्डीत तालुक्यात प्रथम येऊन बाजी मारली आहे.

सर्व यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षक कुमार जाधव व श्रीशैल किणगे यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

## पुणे विभागातून कौस्तुभ गावडे आणि हर्षदा जाधव विजयी

**पान १ वरून** फरक राहिला. निकाल स्पष्ट झाल्यानंतर सचिन सानप यांनी मतदारांचा कौल नम्रपणे स्वीकारत कौस्तुभ गावडे यांचे अभिनंदन केले. या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार दत्तात्रय अच्युतराव सावंत यांनी १२ हजार ६८७ मते मिळवली; मात्र आवश्यक कोट्याअभावी ते शर्यतीतून बाद झाले. तर दुसरीकडे काँग्रेसचे विद्यमान आमदार जयंत दिनकर आसगावकर यांना ८ हजार ९६५ मतांवरच समाधान मानावे लागले.आम्ही विजयाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचलो होतो. पण काही उणिवांमुळे आम्ही थोडे कमी पडलो. ही त्रुटी माझी वैयक्तिक असून ती भविष्यात नक्की भरून काढू. दोन्ही बाजू नवख्या असल्या तरी मुख्य लढत गावडे आणि आपल्यातच थेट रंगली असल्याचे सचिन सानप यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# महेश मालक इंगळे यांच्या सारखा सेवाभावी चेअरमन स्वामींनीच या देवस्थान समितीला दिला

## जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी यांचे गौरव उद्गागार

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

इथे आल्यावर मनाला एक वेगळीच शांती मिळते. श्री स्वामी समर्थ हे साक्षात दत्तावतारी महाराज आणि वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे स्वामींचे निवास स्थान अशा या पवित्र ठिकाणी महेश मालक इंगळे यांच्यासारखा सेवाभावी चेअरमन स्वामी समर्थांनीच देवस्थान समितीला दिलेला आहे असे भावोद्गार लिंगायत पंचमसाली समाजाचे प्रथम जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी यांनी काढले.

आज श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे येऊन जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी यांनी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी देवस्थान कार्यालयात श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश मालक इंगळे , प्रथमेश मालक इंगळे यांनी जगद्गुरु महास्वामीजींचे पाद्यपूजा केली. यावेळी श्रीफळ आणि स्वामी मूर्ती देऊन महाराजांचा भव्य सत्कार केला. यावेळी जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी बोलत होते.



लिंगायत पंचमसाली समाजाचे प्रथम जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी यांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन.
चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी यांचा सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना जगद्गुरु बसवजय मृत्युंजय महास्वामीजी म्हणाले की, देवस्थान समितीचे चेअरमन महेश मालक इंगळे यांनी आपले संपूर्ण जीवन स्वामी सेवेसाठी वाहून घेतले आहे. एका मानकरी घरातले असूनही केवळ स्वामी भक्ती पोटी स्वामी सेवेला वाहून घेणे हे सोपे नाही. त्यांचे हे कार्य हे केवळ अक्कलकोटसाठी नाही तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

त्यांना स्वामी समर्थ दीर्घायुष्य देवो आणि त्यांच्या हातून अशीच सेवा घडत राहो, असा मी आशीर्वाद देतो असेही मनोगत व्यक्त केले. यावेळी चेअरमन महेश इंगळे यांनीही जगद्गुरुंच्या आशीर्वादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पंचमसाली जिल्हा संचालक आनंद बुक्कानूरे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव यांच्यासह पंचमसाली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवोदित धावपटू अभिलाषा वाघमारे हिला नंदा जाधव स्मृती पुरस्कार प्रदान

## स्मृतिदिनी १४० जणांचे रक्तदान; क्रीडा संकुल उभारण्यासाठी पाठपुरावा करणार

**सातारा/प्रतिनिधी:–**

आंतरराष्ट्रीय धावपटू नंदा जाधव यांच्या २७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात नवोदित धावपटू अभिलाषा वाघमारे हिला नंदा जाधव स्मृती पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. डॉ. संदीप काटे आणि सातारा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष दत्ता बनकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात १४० जणांनी रक्तदान केले.

सातारा हिल मॅरेथॉनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संदीप काटे यांनी नंदा जाधव या साताऱ्यातील पहिल्या आंतरराष्ट्रीय धावपटू असल्याचे सांगितले. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी परिसरात क्रीडा संकुल उभारण्यात यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रनर फाउंडेशनच्या माध्यमातून मॅरेथॉनविषयक कायमस्वरूपी दालन उभारण्याचा मानस असून, त्यामध्ये नंदा जाधव यांनी मिळवलेल्या विविध पुरस्कारांचे जतन करण्यात येणार आहे. या माध्यमातून नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष दत्ता बनकर यांनी नंदा जाधव यांचे कर्तृत्व आपण लहानपणापासून पाहिले असल्याचे सांगितले.



श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सातारा व परिसरात क्रीडा क्षेत्राला पूरक मैदाने उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नंदा जाधव यांच्या स्मृतीप्रित्यर्थ क्रीडा संकुल उभारण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रतिष्ठानचे सचिव सुरेश साधले यांनी प्रास्ताविकात नंदा जाधव यांच्या क्रीडा कारकिर्दीचा आढावा घेतला. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष टी. आर. गारळे आणि आनंदराव कणसे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. प्रवीण जाधव, संभाजीनगरचे सरपंच सतीश माने, उपसरपंच काशिनाथ गोरड, नितीन पाटील, सुजीत चावरे, महेश कदम, गिरीश ढेंबरे, उमेश कांबळे, राम कदम, राजेंद्र कामटे, ड. सागर जाधव, संजय गायकवाड, महेश जाधव, रमेश हलगेकर, अमोलभाऊ तांगडे, महेश गडकरी, एचडीएफसी बँकेचे कुलकर्णी, अर्चना देशमुख, हेमंत शिंदे, श्रीकांत देशमुख, किशोर मोरे, जगदाळे यांच्यासह मान्यवर व नागरिक उपस्थित होते. श्रीकांत देशमुख यांनी आभार मानले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 ※मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, ※ सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# लायन्सच्या महाआरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५०० हून अधिक लोकांचा सहभाग; श्री भैरवनाथ मंडळाचा उपक्रम


मसूर : शिबिरात देह दानाचा संकल्प करणाऱ्यांचा सत्कार करताना लायन्सचे पदाधिकारी.

**मसूर/प्रतिनिधी : –**

लायन्स क्लब मसूर, लायन्स क्लब सातारा एमआयडीसी, लायन्स क्लब सातारा अजिंक्य आणि लायन्स क्लब कराड यांच्या संयुक्त विद्यमाने भैरवनाथ नवरात्र उत्सव मंडळ मसूर येथे भव्य महाआरोग्य तपासणी शिबिर व धनुर्वात लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

योग्य वेळी आरोग्य तपासणी केल्यामुळे भविष्यात आरोग्य ही फार मोठी संपत्ती असून ती जपण्याचा प्रयत्न करा निरोगी व आरोग्यदायी जीवनासाठी वेगळीच खबरदारीचे उपाय केल्यास होणारे बरेच आजार टाळतात येऊ शकतात. परिणामी लायन्स क्लब चा हा उपक्रम अतिशय स्तुत्य व अभिनंदनीय असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य लालासाहेब जगदाळे यांनी उद्घाटन प्रसंगी केले.

यावेळी शिबिरात २५० ग्रामस्थांना धनुर्वात लसीकरण करण्यात आले. ३५० जणांची शुगर तपासणी व ब्लड प्रेशर तपासणी करण्यात आली. तसेच उपस्थित ग्रामस्थांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली.

तसेच यावेळी अर्जुन प्रल्हाद दळवी, महेशकुमार शशिकांत जामदार, सुरेश भाऊ पाटील या ग्रामस्थांनी नेत्रदान आणि अवयवदानाचा संकल्प केला व अवयवदानासाठी अर्ज भरून सादर केला. त्यांच्या या संकल्प बद्दल उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

लायन्सच्या विभागीय अध्यक्षा एमजेफ गौरी चव्हाण यांनी मसूर क्लब ला भेट दिली आणि क्लब च्या विविध सेवा कार्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

माजी प्रांतपाल जगदीश पुरोहित, डॉ. मैथिली मिरजे, डॉ. नवनाथ चोपडे, विभागीय अध्यक्षा सौ गौरी चव्हाण, विभागीय सचिव प्रो. डॉ. ईला जोगी, कुलदीप मोहिते, बाळकृष्ण जाधव, सौ सुनीता पाटील, मंजिरी खुस्पे, दुष्यंतराव जगदाळे, दिलीप पाटील, डॉ. रमेश लोखंडे, चंद्रकांत घोलप, जितेंद्र निकम, रमेश जाधव, डॉ. विक्रम शिंदे, अनिल चव्हाण, ॲड. अमरसिंह जगदाळे, सनी रामुगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भैरवनाथ नवरात्र उत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी शिबीर यशस्वीपणे पार पडण्यासाठी परिश्रम घेतले. या शिबिरास ड. दादासाहेब चव्हाण विद्यासंकुल, प्राथमिक आरोग्य केंद्र मसूर यांचे विशेष सहकार्य लाभले. स्वागत लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ विक्रम शिंदे यांनी केले प्रास्ताविक रमेश जाधव यांनी केले आभार जितेंद्र निकम यांनी मानले.

# कराड आरटीओत जुनी प्रमाणपत्र सुविधा सुरू करा

## एटीएस केंद्राचे काम अपूर्ण; वाहनधारकांचा आर्थिक भुर्दंड टाळण्यासाठी संघटनेची मागणी



**कराड/प्रतिनिधी : –**

कराडमधील स्वयंचलित वाहन चाचणी केंद्राचे (एटीएस) काम अपूर्ण असल्याने वाहनधारकांना योग्यता प्रमाणपत्रासाठी साताऱ्याला हेलपाटे मारावे लागत आहेत. हा आर्थिक व मानसिक त्रास टाळण्यासाठी कराड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात हस्तचलित पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र देण्याची सुविधा ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत किंवा एटीएस केंद्र सुरू होईपर्यंत पूर्ववत करावी, अशी मागणी कराड गुड्स ट्रान्सपोर्ट अँड मोटर ओनर्स असोसिएशनने केली आहे. याबाबतचे निवेदन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय इंगवले यांना देण्यात आले.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार परिवहन वाहनांची योग्यता तपासणी स्वयंचलित चाचणी केंद्रामार्फत करणे बंधनकारक आहे. या प्रक्रियेनुसार कराड आरटीओतील संगणकीय प्रणालीद्वारे हस्तचलित पद्धतीने प्रमाणपत्र देण्याची सुविधा बंद करण्यात आली आहे. मात्र, कराडमधील एटीएस केंद्राचे बांधकाम, चाचणी यंत्रसामग्रीची उभारणी, प्रायोगिक चाचण्या, तसेच भारतीय वाहन संशोधन संस्थेची तपासणी व शासनाची अंतिम परवानगी या प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. त्यामुळे केंद्र सुरू होण्यास आणखी किमान महिनाभर लागण्याची शक्यता संघटनेने व्यक्त केली आहे.

सध्या योग्यता प्रमाणपत्रासाठी कराड परिसरातील वाहनधारकांना साताऱ्याला जावे लागत आहे. कराड ते सातारा ये-जा करण्यासाठी सुमारे १०० किलोमीटर, तर पाटण तालुक्यातील काही भागांतून सुमारे २०० किलोमीटरपर्यंत प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे इंधन, पथकर, चालक व कामगारांचे वेतन यांचा अतिरिक्त खर्च होत असून, वाहने व्यवसायापासून दूर राहिल्याने आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे.

वाहनांचा विमा, कर आणि प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अद्ययावत असतानाही योग्यता प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याने वाहने रस्त्यावर चालविण्यात अडचणी येत आहेत. प्रमाणपत्राअभावी भरारी पथकाच्या दंडात्मक कारवाईची भीतीही वाहनधारकांना आहे.

या पार्श्वभूमीवर एटीएस केंद्र कार्यान्वित होईपर्यंत हस्तचलित पद्धतीने योग्यता प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडे आवश्यक शिफारस करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. निवेदन देताना संघटनेचे अध्यक्ष अल्ताफ सवार, उपाध्यक्ष प्रफुल्ल शहा, सचिव मन्सूर बागवान व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# कराडातून दिवाळीचा फराळ देश-परदेशात पोहोचणार

## डाक विभागामार्फत २४ तास पार्सल बुकिंग सेवा उपलब्ध

**कराड/प्रतिनिधी : –**

दिवाळी हा आनंदाचा, प्रेमाचा आणि आपुलकीचा सण. दिवाळीनिमित्त आपल्या प्रियजनांना घरगुती फराळ, मिठाई, भेटवस्तू आणि स्नेहाच्या शुभेच्छा पाठविण्यासाठी भारतीय डाक विभागाने नागरिकांना टपाल सेवाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अधिक्षक डाकघर कराड विभाग कराड येथे २४ तास पार्सल बुकिंग सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या सोयीनुसार पार्सल बुकिंग करता येणार आहे. देशाच्या विविध भागांत तसेच परदेशात राहणाऱ्या नातेवाईकांना, मित्रांना आणि आप्तस्वकीयांना दिवाळीचा फराळ व भेटवस्तू पाठविण्यासाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे

महाराष्ट्रासह देशाच्या विविध राज्यांमध्ये घरगुती दिवाळी फराळ, भेटवस्तू आणि इतर पात्र वस्तू पाठविण्यासाठी ग्राहक भारतीय डाक विभागाच्या देशांतर्गत पार्सल सेवांचा लाभ घेऊ शकतात. परदेशात वास्तव्यास असलेल्या आपल्या प्रियजनांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पार्सल बुकिंगची सुविधा उपलब्ध आहे संबंधित देशाचे आयात नियम, खाद्यपदार्थ पाठविण्यावरील निर्बंध आणि भारतीय डाक विभागाच्या अटी यांची माहिती घेऊनच फराळाचे पार्सल बुक करावे.

दिवाळीच्या काळात पार्सल पाठविण्यासाठी होणारी गर्दी आणि वेळेची अडचण लक्षात घेता, सातारा सॉर्टिंग पोस्ट ऑफिसमधील २४ तास बुकिंग सुविधेचा नागरिकांनी लाभ घ्यावा. व्यापारी, व्यावसायीक, गृहउद्योग चालक, महिला बचत गट आणि फराळ उत्पादकांनीदेखील आपल्या उत्पादनांची देशभरात तसेच परदेशात पाठवणी करण्यासाठी भारतीय डाक विभागाच्या सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन अधीक्षक कराड विभाग कराड, यांनी केले आहे.

# कर्जतमधील जलविद्युत प्रकल्पास स्थगिती द्यावी

## सहयाद्री वाचवा मोहीमेतंर्गत पर्यावरण कार्यकर्ते यांची मागणी



**सातारा/प्रतिनिधी:–**

रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यामधील साई डोंगर-१ पंप स्टोअरेज प्रकल्पाची प्रस्तावित क्षमता ३००० मेगा वॅट आहे. या प्रकल्पासाठी एकुण २३३ हेक्टर वन जमीन वळविण्याचा उल्लेख आहे. पत्रात ३२,४९० झाडांच्या संदर्भातील अट/संरक्षणाचा उल्लेख दिसतो. हा प्रकल्प हा वन जमीनीवर होत असल्याने कोणतीही पुर्व सूचना न देता. केंद्र शासनाने याला परवानगी दिली आहे, त्यामुळे या प्रकल्पास तातडीने स्थगिती द्यावी अशी मागणी सहयाद्री वाचवा मोहीमेतंर्गत जिल्ह्यातील सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते यांनी नागेश पाटील निवासी उप जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे.

निवेदनात, सदरचा प्रकल्प हा पश्चिम घाट संवेदनशिल क्षेत्रात येत आहे. ज्या चार गावामध्ये हा प्रकल्प प्रस्तावित आहे, ती चार ही गावे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात येत आहेत. केंद्राने जी ७ वी नोटीफिकेशन काढली आहे त्यामध्ये या चार गावांचा समावेश आहे. कर्जत तालुक्यातील या प्रकल्पास केंद्र शासनाने जी परवानगी दिली आहे ती दुटप्पी भुमिकेची आहे. एकीकडे पश्चिम घाट पर्यावरणी संवेदनशील गावाचा समावेश करणे, यादीमध्ये संबंधीत गावे समाविष्ठ असणे आणि दुसरीकडे राज्य शासनाला या संवेदनशील क्षेत्रा सदरच्या प्रकल्पास परवानगी देणे ही केंद्र शासनाची दुटप्पी भुमिका आहे. ती आम्हांला मान्य नाही. जो पर्यंत पश्चिम घाट पर्यावरणीय संवेदनशिल गावाचे नोटीफिकेशन केंद्र शासन जारी करत नाही तोपर्यंत रायगड जिल्ह्यातील कर्जत प्रस्तावित साई डोंगर-१, ३००० मेगा वॅट जलविद्युत प्रकल्पास स्थगिती द्यावी अन्यथा आम्हाला या कामी योग्य त्या न्यायालयात दाद मागण्याचा व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही कार्यकर्ते यांनी दिला आहे.

निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, पुणे विभागीय आयुक्त, पर्यावरण व हवामान बदल विभाग सदस्य सचिव, राष्ट्रीय हरित लवाद, पुणे उपवनसंरक्षक, पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पाठवण्यात आल्या आहेत. यावेळी सुशांत मोरे, शिवाजी जाधव, महारुद्र तिकुंडे, कपिल राऊत,भरत रावळ, महेश शिवदास, गुलाब बनसोडे, प्रशांत डोंगरे, रवींद्र बेलोशे, शेखर कदम, दत्तात्रय जाधव, राजेंद्र केंजळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ऊस वाहतुकीच्या वाहनांना रिफ्लेक्टर आवश्यक

## सिद्धेश्वर जंगम




**वाळवा/प्रतिनिधी : –**

पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिप्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम आष्टा पोलीस स्टेशनचे पोलीस इन्स्पेक्टर सिद्धेश्वर जंगम यांच्या हस्ते पार पडला.

कारखान्याचा गळीत हंगाम २०२६-२०२७ सुरू झाला आहे .उसाने भरलेल्या वाहनामुळे रस्त्यावर वर्दळ वाढते. समोरचे वाहन दिसले नाही तर येणाऱ्या वाहनाची धडक होऊन अपघात घडण्याचा धोका निर्माण होतो. तरी सदरचे अपघात टाळण्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनाला रिप्लेक्टर असणे अत्यंत आवश्यक आहे ही सुरक्षेची महत्त्वाची गरज ओळखूनच हुतात्मा कारखान्यावर ऊस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी, ट्रॅक्टर ,अंगद या वाहनांना रिफ्लेक्टर लावणेत आले व वाहन मालकांना रिफ्लेक्टरचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना पोलीस इन्स्पेक्टर जंगम यांनी, वाहन मालकांना ,मागील वाहने पाहण्यासाठी आरसे लावावेत, म्युझिक सिस्टीम लावू नये, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करू नये, रस्त्याच्या कडेला उसाने भरलेली वाहने उभी करू नयेत, सर्विस रोडचा वापर करावा, वाहने उभी करताना लावलेले दगड काढावेत, शेतातून मुख्य रस्त्यावर वाहन आणताना इतर वाहनाचा अंदाज घेऊनच मुख्य रस्त्यावर वाहन आणावे, दारू पिऊन वाहन चालवू नये, वेगावर मर्यादा ठेवावी अशा महत्त्वाच्या सुरक्षा सूचना दिल्या.

यावेळी पोलीस हेडकॉन्स्टेबल संतोष चव्हाण, हरीश चितळे कारखान्याचे कार्यकारी संचालक शिवाजी पाटील, सेक्रेटरी मुकेश पवार, शेती अधिकारी संजय गायकवाड, ड. वरूनराज माने, ऊस विकास अधिकारी ओंकार खोत, केनयार्ड सुपरवायझर धनंजय पाटील, मदन पाटील, निलेश सव्वाशे, शरद जाधव, शेती गटाधिकारी, शेती विभागाचा स्टाफ, केनयार्ड विभागातील कर्मचारी तोडणी वाहतूक कंत्राटदार ऊस तोडणी मजूर उपस्थित होते.

# कॉलेज परिसरातील हुल्लडबाजीसह रिफ्लेक्टरविना ऊस वाहतूक करणाऱ्यांवर पुसेगाव पोलिसांची धडक कारवाई

## ७३ प्रकरणांत ५५ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल ; वाहतूक नियम मोडणाऱ्यांना दणका



**पुसेगाव/प्रतिनिधी:–**

कॉलेज परिसरात हुल्लडबाजी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे तसेच वाहनांना रिफ्लेक्टर न लावता ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांविरोधात पुसेगाव पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. या विशेष मोहिमेत एकूण ७३ प्रकरणे दाखल करून ५५ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

सातारा जिल्ह्यातील बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली.

पुसेगाव व खटाव परिसरातील शाळा-महाविद्यालयांच्या आवारात हुल्लडबाजी करणे, रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, रॅश ड्रायव्हिंग करणे तसेच रिफ्लेक्टर न लावता ऊस वाहतूक करणे अशा प्रकारांवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले. विशेषतः रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टर नसलेल्या ऊस वाहतूक वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढत असल्याने अशा वाहनचालकांविरोधात कारवाई करण्यात आली.

पुसेगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस उपअधीक्षक कोमल शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस अंमलदार संतोष बागल व बापूराव नवले यांनी विशेष नाकाबंदी मोहीम राबवली. यावेळी बेशिस्त वाहनचालकांसह कॉलेज व एसटी स्टँड परिसरातील रोडरोमिओंवरही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चांगलाच दणका बसला असून, वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, वाहनांना आवश्यक रिफ्लेक्टर लावावेत आणि शाळा-महाविद्यालय परिसरात शिस्त राखावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# किवळमध्ये उद्योजक स्वागत सोहळा उत्साहात

## उमेद अभियानांतर्गत महिला बचतगटांच्या कार्याचा गौरव


किवळ:मैत्री महिला ग्रामसंघाच्या वतीने उद्योजक महिलांचा विशेष गौरव करण्यात आला

**मसूर/प्रतिनिधी : –**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद अभियान) कराड तालुक्यातील किवळ येथे मैत्री महिला ग्रामसंघाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित उद्योजक स्वागत सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी महिला बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरू असलेल्या आर्थिक, सामाजिक व उद्योजकीय कार्याचा गौरव करण्यात आला. महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि बचतगटांच्या कार्याला बळकटी देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमास कल्पतरू प्रभाग संघाच्या अध्यक्षा उषाताई जगदाळे, प्रभाग समन्वयक उस्मान मुलाणी माजी उपसरपंच पोपट साळुंखे ग्रामपंचायत सदस्य प्रभावती सूर्यवंशी ग्राम संघाचे अध्यक्ष सुरेखा साळुंखे उपाध्यक्ष अनिता मोहिते कोषाध्यक्ष वर्षा साळुंखे सचिव हेमांगी साळुंखे पीजी ग्रुप अध्यक्ष जयश्री कुंभार सचिव पंचशीला साळुंखे कोशाध्यक्ष शैला साळुंखे कृषी सखी सोनाली क्षीरसागर,आश्वीनी गोडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यामध्ये संगीता साळुंखे (शिव महिला समूह), संध्या साळुंखे (साई श्रद्धा समूह), शुभांगी साळुंखे (शिव महिला समूह), तारादेवी गिरीगोसावी (सहेली समूह), सारिका जाधव (सावित्रीबाई फुले समूह), कुंदा साळुंखे (गायत्री समूह) आणि प्रभावती सूर्यवंशी (भक्ती समूह), उर्मिला साळुंखे (गायत्री समूह), पंचशिला साळुंखे (समृद्धी स्वयं सहायता समूह), पल्लवी साळुंखे (गणेश समूह), सीमा शेडगे (रेणुका समूह), विमल जाधव (क्रांती समूह), दुर्गा गट आणि सुरेखा साळुंखे (उमेद समूह) यां सर्वांच्या कार्याचीही दखल घेण्यात आली.

याशिवाय अर्चना पवार (स्वामी समर्थ समूह), विनया कुलकर्णी (रिद्धी महिला समूह), जयश्री साळुंखे (अष्टविनायक समूह), वैशाली बाबर (प्रगती समूह), अश्विनी गोडसे, इंदुमती घाडगे (जिजाऊ महिला समूह) आणि गीतांजली मोहिरे सखी (महिला समूह) यांच्यासह विविध महिला प्रतिनिधींचा सहभाग होता.

संयोजन सीआरपी रेखा साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली बाबर यांनी केले. तर कृषी सखी राजश्री साळुंखे यांनी आभार मानले.

# पाण्याच्या काटेकोर नियोजनाचा मंत्रिमंडळाचा निर्णय

पान १ वरून

टोला पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी लगावला. पाणी नियोजनाबाबत दोन नोव्हेंबरला कालवा सल्लागार समितीची बैठक होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राजू शेट्टी यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना, तसेच कोयना धरणातील पाणी सोडण्याच्या मागणीवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर देसाई यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. धरणातील उपलब्ध पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची गरज, जनावरांसाठी आवश्यक पाणी आणि राखीव कोटा यांचा विचार करून उर्वरित पाण्याचे नियोजन करण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय आहे. त्यानुसार पालकमंत्री आणि कालवा सल्लागार समितीचे सदस्य म्हणून आपली जबाबदारी पार पाडत असल्याचे त्यांनी सांगितले.

ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाणी उपलब्ध राहावे, यासाठी अतिरिक्त दहा टक्के कोटा राखीव ठेवण्याचा निर्णय झाला आहे. उर्वरित पाण्याचे नियोजन कसे करायचे, पाणी सोडण्याचे रोटेशन कसे ठरवायचे, याबाबत जलसंपदा विभागाकडून आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर आणि मंत्री, आमदार व खासदार यांच्याशी चर्चा झाल्यावरच पुढील निर्णयाबाबत स्पष्टता येईल. सांगलीला पाणी द्यायचे नाही, अशी सरकारची भूमिका नसल्याचेही देसाई यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे पुतळे सांगलीत जाळण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिल्याबाबत विचारले असता, देसाई म्हणाले, राज्य संविधान आणि कायद्यानुसार चालते. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे ही संबंधित पालकमंत्र्यांची जबाबदारी आहे. सरकार आपले संवैधानिक अधिकार वापरत आहे. कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये. धरणावर जाऊन पाणी सोडण्याचा प्रयत्न केल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास संविधान व कायद्यानुसार कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# कराडमध्ये पाणीपुरवठ्याला कात्री

पान १ वरून

पालिका प्रशासन आवश्यक ती काळजी घेणार आहे. नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार पाणी मिळावे, यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही यादव यांनी स्पष्ट केले.यावेळी मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, लोकशाही आघाडीचे जयंत पाटील यांच्यासह नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

# यामिनी सूर्यवंशीची बॅडमिंटन स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड



**कराड/प्रतिनिधी : –**

येथील सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमधील राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू यामिनी महेश सूर्यवंशी (बी.कॉम.आय.टी -३) हिची दि २९ ऑक्टोबर ते ०२ नोव्हेंबर २०२६ रोजी चारोतर विद्यापीठ ऑफ सायन्स आणि टेक्नॉलॉजी, चारूसत (गुजरात) येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला बॅडमिंटन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संघांमध्ये निवड झाली आहे

या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड.रवींद्र पवार, ज्युनिअर कॉलेजचे प्रमुख प्रा. हणमंतराव मांडके, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा.डॉ. उत्तम मोरे, तसेच कला शाखेचे उपप्राचार्य प्रा.डॉ.रामचंद्र व्हनबट्टे वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य प्रा.माधुरी कांबळे, तसेच महाविद्यालयातील सिनिअर,ज्युनिअर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी अभिनंदन केले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा.डॉ. विद्या पाटील, प्रा. सचिन चव्हाण, प्रा.अमित पोळ, प्रा.रणजीत पाटोळे या सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# वेसरफमध्ये 'रेड मड 4X4 चॅलेंज'चा थरार

## पेट्रोलमध्ये नचिकेत पाटील, डिझेलमध्ये अक्षय खोत, महिलांमध्ये विजापूरच्या कविता देसाई विजयी


वेसरफ येथे झालेल्या 'रेड मड ४द४ ऑफ-रोड चॅलेंज स्पर्धेतील महिला गटातील विजेत्या कविता देसाई यांच्याबरोबर अश्विन शिंदे.

**कोल्हापूर/प्रतिनिधी : –**

4X4 कोल्हापूर स्पोर्ट्स क्लब आयोजित 'रेड मड 4X4 ऑफ-रोड चॅलेंज -बी अनस्टॉपेबल' ही थरारक स्पर्धा वेसरफ येथे लाल मातीत मोठ्या उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत पेट्रोल कॅटेगरीत नचिकेत पाटील प्रथम विजेते ठरले. डिझेल कॅटेगरीत अक्षय खोत प्रथम, सत्यदीप चिकबिरे द्वितीय तर अभिषेक गांधी तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले. महिला कॅटेगरीमध्ये विजापूरच्या कविता देसाई यांनी बाजी मारली. माणकापूरचे रोहित वराळे यांना बेस्ट मार्शल अवॉर्ड देऊन गौरवण्यात आले.

चिखल, दगड, पाणी, तीव्र चढ आणि वळणांनी भरलेला हा खडतर ट्रॅक हे मोठे आव्हान होते. नचिकेत पाटील यांनी वेग आणि अचूक नियंत्रणाने ट्रॅक पार केला. डिझेल गटात अक्षय खोत, सत्यदीप चिकबिरे आणि अभिषेक गांधी यांच्यात अटीतटीची लढत झाली. पुरुषांच्या वर्चस्व असलेल्या क्षेत्रात विजापूरच्या कविता देसाई यांनी जिद्दीने विजय मिळवला.

वेसरफ येथील आजरी इको व्हॅलीमध्ये पार पडलेल्या स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला अश्विन शिंदे, प्रशांत काशीद, पल्लवी यादव, कुणाल धुम्मा, कृष्णकांत जाधव, विनायक शिंदे, दिग्विजय लोळगे, यांच्यासह 4X4 कोल्हापूर स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी, स्पर्धक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**

गुरुवार दि. २९ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ८-२-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 125 260 440 | 8-5 | 140 230 780 | 86-15-20-97-54 |

**कल्याणम**

उदय-अस्त सिंगल ९-१-३ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 126 450 144 | 9-2 | 156 246 480 | 90-52-18-37-26 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त सिंगल २-५-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 129 570 660 | 2-7 | 158 248 446 | 29-14-57-80-46 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

**आज का अंदाज**

गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२६

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ३ - ५ - ४ - ७ | २ - ४ - ७ - ८ |
| १६६-१७७-१६७-२६९ | ११०-२३९-२७८-१२५ |
| २२९-३३९-३५६-३६८ | २५५-५९०-४५०-५६७ |
| ३३७-२३०-२२०-४६७ | ३३६-३५६-१३३-४४० |
| जोडी | जोडी |
| ३१ -५१ - ४० - ७० | २१ -४१ - ७५ - ८५ |
| ३९ -५९ - ४२ - ७२ | २० -४० - ७३ - ८३ |
| ३८ -५८ - ४६ - ७६ | २९ -४९ - ७६ - ८६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. २९-३० ऑक्टोबर

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर २०२६

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| २० | ५० | ८३ | ९३ |
| २२ | ५५ | ८६ | ९६ |
| २६ | ५६ | ८७ | ९७ |
| ६७९ | २४९ | २६० | २७० |
| ५८९ | ४५६ | ४५९ | ४५० |
| ४९९ | ३५७ | ३६९ | ३६० |

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

